**MHKO100005552010**

## रे.क.नं. १७५/२०१० मधील निशाणी क्र. १३२ वरील आदेश
(बाबू शिंदे वि. सदाशिव शिंदे)

१. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.७अ श्रीमती सोनाबाई नारायण शिंदे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.७अ श्रीमती सोनाबाई नारायण शिंदे  या दिनांक ०५/०९/२०२४ रोजी मयत झाल्या असून  प्रतिवादी क्र. ७क, ७ड व ७इ हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत.

४. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, अर्जातील कथने खोटी व चुकीची असून अर्ज नामंजूर करणेत यावा.

५. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे दावा वाटपाकरीता व  कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र.७अ श्रीमती सोनाबाई नारायण शिंदे यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. सबब अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आ दे श

१) वादी यांचा निशाणी क्र. १३२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2025.03.07
11:31:30 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०६/०३/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज